# स्थानिकांना रोजगार उपलब्ध करून देणार - आ.अंतापुरकर

## देगलूर महाविद्यालयाचे वार्षिक स्नेहसंमेलन थाटात संपन्न

देगलूर (प्रतिनिधी )

देगलूर-बिलोली तालुक्यातील सुशिक्षित बेरोजगार तरुण रोजगाराच्या शोधार्थ पुणे व हैद्राबाद यासारख्या शहरात स्थलांतरित होणाऱ्या तरुणांची संख्या मोठी असून या बेरोजगारांना रोजगार मिळवून देण्याचे प्रयत्न आपण करू असे प्रतिपादन देगलूर विधानसभेचे आ.जितेश अंतापूरकर यांनी केले. ते येथील अ.व्या.शिक्षण संस्था संचलित देगलूर महाविद्यालयातील स्नेहसमेलनाच्या समारोप प्रसंगी प्रमुख मार्गदर्शक म्हणून ते बोलत होते. यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अडत व्यापारी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष प्रकाश पाटील बेम्बरेकर होते.



व्यासपीठावर प्रमुख पाहुणे म्हणून देगलूर उपविभागीयअधिकारी अनुप पाटील,अडत व्यापारी शिक्षणसंस्थेचे उपाध्यक्ष जनार्धन चिद्रावार,कोषाध्यक्ष विलास तोटावार , संस्थेचे कार्यकारिणी सदस्य रविंद्र अप्पा द्याडे ,विजय उनग्रतवार,चंद्रकांत नारलावार, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.मोहन खताळ उपस्थित होते. प्रारंभी प्रा.गौतम भालेकर व प्रकाश सोनकांबळे यानी स्वागत गीत गाऊन स्वागत केले. यानंतर मान्यवरांचे स्वागत करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रभारी प्रा.डॉ.संजय पाटील यांनी केले.

यावेळी जनहित साहित्य पुरस्कार. महाविद्यालयातील प्रा.महेश कुलकर्णी यांना जाहीर झाल्याबद्दल तसेच विद्यार्थिनी कु. अवंतिका इंगळे ही राष्ट्रीय छात्र सेना शिबिरात सहभागी झाल्या बद्दल दोघांचा सत्कार मान्यवरांच्या हस्ते करण्यातआला. प्रमुख पाहूण्याचा परिचय डॉ.बा. रा.कत्तुरवार यांनी करून दिला. आ.अंतापूरकर पुढे म्हणाले युवकांनी आपली जवाबदारी जाणून घ्यावी.प्रत्येकांनी आपल्या गावाकडच्या माणसांशी नाळ जोडून कार्य केले पाहिजे समाजात असे काम करणाऱ्या माणसांची प्रेरणा युवकांनी घ्यावी.देगलूरला लॉजीस्टीक हबची मंजूरी मिळाली असल्याची माहिती यावेळी त्यांनी दिली. विद्यार्थ्यांना घडविण्यात गुरूजनाचा मोठा वाटा असतो.कला,गुण कौशल्य वाढविण्याची संधी विद्यार्थी जीवनातच मोठी असते .सोशल मिडीया व मोबाईल मधे व्यस्त न राहता चांगल्या संगतीत रहा. दुष्परिणामापासून दूर रहा,आई वडीलाचा आदर ठेवा.असे सांगीतले या नंतर प्रमुख पाहुणे देगलूरचे उपजिल्हाधिकारी अनुप पाटील यांनी विद्यार्थ्यांनी आपले अधिकार अन् कर्तव्य जाणावेत. युवकानी जीवनात आपले कार्य राष्ट्रासाठी अर्पित करून अधिकार आणि कर्तव्य याची माहिती करून घ्यावी. चांगले नेतृत्त्व जोपर्यंत मिळणार नाही तोपर्यन्त आपल्यातील सुप्त गुणांचा विकास करता येत नाही. वार्षिक स्नेहसंमेलन हे प्रत्येक तरुण व तरुणींच्या जीवनातील अविस्मरणीय काळ असतो. कला ,साहित्य, क्रीडा व सांस्कृतिक स्पर्धेच्या माध्यमातून सुप्त कला गुणांना विकसित करण्याची सुवर्ण संधी विद्यार्थ्यांना प्राप्त होत असते असे प्रतिपादन पाटील यांनी केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षीय समारोपात प्राचार्य डॉ.मोहन खताळ यांनी स्नेहसंमेलन म्हणजे विद्यार्थ्यांचा सर्वांगीण शिक्षणाचा भाग असून महाज्योती सारख्या कार्यक्रमामुळे विद्यार्थ्यांचे कौशल्य वृध्दिंगत होणार आहे. समारोपानंतर स्नेहसंमेलनातील विविध स्पर्धेत यशस्वी विदयार्थ्यांना सन्मानचिन्ह, प्रमाणपत्र वितरण करून गौरविण्यात आले. तसेच राष्ट्रीय मतदार दिननिमित्त लोकशाहीवर निष्टा ठेवण्याची शपथ देण्यात आली. शेवटी राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता झाली. याप्रसंगी उपप्राचार्य डॉ.अनिल चिद्रावार, उपप्राचार्य एम.एम. चमकुडे पटेल, उपप्राचार्य डॉ. व्ही.जी.शेरीकर, कार्यालयीन अधीक्षक गोविंद जोशी, यांच्यासह सर्व प्राध्यापक ,कर्मचारी, विद्यार्थी व विद्यार्थिनी बहुसंख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.संग्रामपाटील तर आभार प्रा. डॉ.रत्नाकर लक्षट्टे यांनी मानले.

Scanned with OKEN Scanner